सत्यमेव जयते


**आबासाहेब हराळ**
संचालक, आत्मा

☎ कार्यालय : ०२० – २५५३ ६०१०
फॅक्स : ०२० - २५५३ ६००९
e-mail : diratmams@gmail.com


जा.क्रं/एमएसीपी/पीआययु(कृषि)/तंत्र/शेगस्था/मासु/१८४१/१४
दिनांक : ११ /०९/२०१४

प्रति,

प्रकल्प संचालक, आत्मा
अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, शेतकरी गट स्थापनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे बाबत. . . . .

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, राज्यात कृषि व पशुसंवर्धनाचे शेतकरी गट स्थापनेसाठी स्वयंसेवी संस्थांची सेवा पुरवठादार म्हणून निवड करण्यांत आली असून, जिल्हास्तरावर सेवा पुरवठादार यांचे मार्फत शेतकरी गट स्थापनेची कार्यवाही सुरू आहे. शेतकरी गट स्थापनेची कार्यवाही सुलभ होण्याच्या दृष्टिने प्रकल्पा मार्फत सविस्तर मार्गदर्शक सुचना तयार करण्यांत आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने, सोबत सहपत्रीत करण्यांत आलेल्या मार्गदर्शक सुचने नुसार, आपल्या जिल्ह्यात शेतकरी गट स्थापनेची कार्यवाही करण्यांत यावी.

संचालक, आत्मा,
कृषि आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,

१) मा. प्रकल्प संचालक, एम.ए.सी.पी., पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) विभागीय कृषि सहसंचालक, पुणे, कोल्हापूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) उपसंचालक, सामेती यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) सेव पुरवठादार संस्था, (पहिला, दुसरा व तिसरा टप्पा), यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प
# शेतकरी गट स्थापन करण्यासाठी मागदर्शन सुचना

**प्रस्तावना :-**

संपुर्ण देशात सध्या कृषि विस्तारासाठी आत्मा पद्धत स्विकारण्यात आलेली आहे. कृषि विस्ताराच्या आत्मा पद्धतीत शेतकरी गट स्थापन करुन या गटांच्या माध्यमातून कृषि विस्तार करण्याला अनन्यसाधारण महत्व आहे. राज्यात आत्मा संस्थेमार्फत विविध योजनांमधून शेतकरी गटांची स्थापना करण्यात आली आहे आणि अजुनही गट स्थापन करण्यात येत असून ही प्रक्रिया सतत चालू राहणारी आहे. स्थापन झालेल्या शेतकरी गटांना विशिष्ट असा कार्यक्रम (Activity) न दिल्यास ते गट कालांतराने कमकुवत होतात आणि पुढे त्यांचे अस्तित्व जाणवत नाही. शेतकरी गट बळकट करण्यासाठी त्यांना विशिष्ट असा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात केवळ उत्पादकता वाढविणेसाठी कृषि विस्तार मर्यादित न ठेवता त्यापुढे जाऊन बाजाराभिमुख कृषि विस्तार करणे अपेक्षित आहे. प्रकल्पाची ही मुळ संकल्पना लक्षात घेऊन या प्रकल्पात तयार होणारे गट बाजाराशी जोडणे अपेक्षित आहे. यासाठी उत्पादकता वाढीबरोबरच बाजाराला अपेक्षित गुणवत्तापूर्ण शेतमालासाठी, काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब करुन, विशिष्ट मानांकनाप्रमाणे शेतमालाची प्रतवारी करणे आणि बाजारात अधिक किंमत मिळविणे, या बाबींना महत्व देण्यात आले आहे. या तत्वांना अनुसरुन महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात तयार होणारे गट बाजारभिमुख कृषि विस्तारासाठी नवनवीन बाजारांच्या संधीचा फायदा मिळविणारे गट तयार होणे अपेक्षित आहेत. हे गट तयार करीत असतांना एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात समुह पद्धतीने (Cluster) गट स्थापन करणे, या गटांचा एक संघ स्थापन करणे आणि या संघांची नोंदणी कंपनी कायद्याखाली करुन अंतिमतः उत्पादक शेतक-यांच्या कंपन्या स्थापन करण्यात येणार आहेत. केवळ कंपनी स्थापन करुन न थांबता पुढे या कंपन्या शेतमालाचे एकत्रिकरण करुन पर्यायी बाजार शोधतील आणि शेतक-यांना अधिक उत्पन्न मिळवून देतील अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात वर नमुद केल्याप्रमाणे समुह पद्धतीने गटांची स्थापना करणे हा पहिला टप्पा असून दुस-या टप्प्यात समुहातील गटांना एकत्र करुन त्यांचा संघ स्थापन करणे, संघाची नोंदणी कंपनी कायद्याखाली करणे आणि अशा कंपन्यांना बाजाराशी जोडणे या बाबी करावयाच्या आहेत.

**गट स्थापनेसाठी यंत्रणा :-**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत शेतकरी गट स्थापनेसाठी स्वयंसेवी संस्थांना सेवापुरवठादार संस्था म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सध्या आत्मा संस्थेकडे उपलब्ध मनुष्यबळ कमी आहे, म्हणून या सेवापुरवठादार संस्था आत्मा संस्थेला मदत करणा-या सहाय्यक संस्था (Extended Arm) म्हणून काम करतील. सेवापुरवठादार संस्थाकडून काम करुन घेण्याची जबाबदारी आत्मा संस्थांची आहे.

**सेवापुरवठादार संस्थांची नेमणूक :-**

सेवापुरवठादार संस्थाची नेमणूक राज्यस्तरावरुन जागतिक बँकेच्या संपादन पद्धतीने (Procurement Procedure)करण्यात आली आहे. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्यातील १० जिल्ह्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र सेवापुरवठादार संस्था नेमण्यात आली होती. तथापि दुस-या व तिस-या टप्यातील जिल्ह्यांसाठी सेवापुरवठादार संस्थांची नेमणूक ही साधारणतः एका विभागातील सर्व जिल्ह्यांसाठी एक याप्रमाणे संस्था निवडण्यात आल्या आहेत. जिल्हानिहाय काम करणा-या संस्थांची सुची प्रपत्र - १ नुसार आहे. या संस्थांकडे उपलब्ध मनुष्यबळाची माहिती स्वतंत्र्य पत्रान्वये देण्यात आलेली आहे. प्रपत्र - २ मध्ये त्याची शहानिशा करुन त्याचा अहवाल तयार करावा. या संस्थाबरोबर करण्यात आलेले करार सर्व प्रकल्प संचालक, आत्मा आणि उपसंचालक, सामेती यांना दिले आहेत. या करारानुसार सेवापुरवठादार संस्थाकडून काम करुन घेणे आवश्यक आहे.

**शेतकरी गट स्थापनेसाठीची प्रक्रिया :-**

**१. पायाभुत/मुलभुत सर्व्हेक्षण आणि प्रारंभिक अहवाल (Baseline Survey & Inception Report)**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात कृषि विभागामार्फत राबवयाच्या सर्व बाबींचे कार्यक्षेत्र हे पणन विभागामार्फत राबविण्यात येणा-या बाजार विकासासाठी निवडलेल्या क्षेत्राप्रमाणे राहणार आहे. उदा :- तालुकास्तरीय कृषि उत्पन्न बाजार समिती पणन विभागामार्फत विकासासाठी निवडण्यात आली असेल तर तो संपूर्ण तालुका कृषि विभागाच्या बाबी राबविणेसाठीचे कार्यक्षेत्र राहील. तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती निवडलेली नसेल परंतु त्या तालुक्यातील काही आठवडी बाजार निवडलेले असल्यास त्या आठवडी बाजारात शेतमाल आणणा-या जवळपासच्या ५ कि.मी. परिसरातील गावांचा समावेश, प्रकल्पाच्या अन्य बाबी राबविणेसाठीचे कार्यक्षेत्र असेल. तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे ज्या तालुक्यातील गोदाम प्रकल्पांतर्गत निवडलेले असेल तो तालुका प्रकल्पाच्या अन्य बाबी राबविण्यासाठी कार्यक्षेत्र असेल.

वर नमुद केल्याप्रमाणे अगोदर जिल्ह्यातील महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाचे कार्यक्षेत्र निश्चित करुन अशा कार्यक्षेत्रातील तालुकानिहाय गावांची यादी तयार करावी. प्रकल्पाचे असे कार्यक्षेत्र जिल्ह्याच्या नकाशावरही स्वतंत्र रंगाने अधोरेखीत करुन नकाशा तयार करावा. अशा प्रकल्प क्षेत्रातील गावांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी या मार्गदर्शक सुचनांसोबत दिलेल्या प्रपत्रात (परिशिष्ट ३ मधील प्रपत्रात) माहिती सेवापुरवठादार संस्थांनी संकलित करावी. सर्व्हेक्षण अहवालासाठी लागणारी काही माहिती जिल्हास्तरावरील तर काही माहिती गावस्तरावरील आहे. सर्व्हेक्षणासाठी लागणारा Secondary Data उदा :- जिल्ह्याचे सरासरी क्षेत्र, उत्पन्न उत्पादकता तसेच ठराविक गावाचे क्षेत्र इ. माहिती जमा करण्यासाठी कृषि विभागातील अधिका-यांनी सेवापुरवठादार संस्थेला सहकार्य करावे. तथापी Primary Data उदा - निवडलेल्या (सॅम्पल)प्रमाणे शेतकरी निहाय डाटा सेवापुरवठादार संस्थांनी जमा करावयाचा आहे. या सर्व्हेक्षणानंतर शेतक-यांकडे विक्रीसाठी शेतमाल (Marketable Surplus) अधिक असलेल्या गावांचीच निवड गट स्थापनेसाठी समुह (Cluster) म्हणून निवडावेत. तसेच अशा समुहांची निवड करतांना आत्मा संस्थेच्या अधिका-यांशीही चर्चा करावी आणि गट स्थापनेसाठीचे समुह (Cluster) अंतिम करावेत. असे समुह (Cluster) अंतिम झाल्यानंतर परिशिष्ट - ४ व ६ मध्ये दिलेल्या

अनुक्रमणीकेतील विषयांनुसार प्रारंभिक अहवाल सादर करावा. प्रारंभिक अहवाला सोबत जिल्ह्यातील महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात गट स्थापनेसाठी निवडलेल्या समुहाची (Cluster) गावे वेगळया रंगांनी दाखविणारा नकाशा जोडावा.

असा प्रारंभिक अहवाल सेवापुरवठादार संस्थांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या शिफारसीसह नोडल अधिकारी, पी.आय.यु.(कृषि) यांचेकडे सादर करावा.

**२. गट म्हणजे काय?**

दोन किंवा दोन पेक्षा अधिक शेतकरी समान ध्येयाने आणि उद्दिष्टाने जेव्हा एकत्रीत येतात, तेव्हा अशा शेतक-याच्या समुहाला शेतकरी गट म्हणतात. अशा समुहाला एकत्र आणण्याच्या प्रक्रियेला गट संघटन असे म्हणतात. अशा गटामध्ये १५ ते २० शेतकरी एकत्र आल्यास पुढील कामकाजाच्या दृष्टीने ते सोईचे होते.

**३. निवडलेल्या समुह क्षेत्रात (Cluster) अस्तित्वात असलेल्या गटांची माहिती घेणे आणि त्यांचा प्रकल्पात समावेश करणे :-**

निवडलेल्या समुहात गटांना संघटीत करुन त्यांचा संघ स्थापन करणे हे अंतिम उद्दिष्ट राहणार आहे. नवीन गट स्थापन करावयाचा आग्रह केल्यास अंतिम संघात अस्तित्वात असलेले काही चांगले गट समाविष्ट होऊ शकणार नाहीत. म्हणून केवळ नवीन गटच स्थापन करण्याचा आग्रह आत्मा संस्थेने करु नये. अस्तित्वात असलेल्या गटांना सुद्धा या प्रक्रियेत सहभागी करुन घ्यावे, असे करीत असतांना नवीन गटांना जे प्रशिक्षण दिले जाईल तसेच प्रशिक्षण अस्तित्वात असलेल्या गटांनाही देऊन त्यांचे बळकटीकरण करावे.

**४. जनजागृती मोहिम :-**

प्रकल्प कार्यक्षेत्रातील निवडलेल्या गावातील लोकांमध्ये शेतकरी गटांचे महत्व पटवून या गटामध्ये जास्तीत जास्त शेतक-यांनी सहभाग घ्यावा, यासाठी शेतक-यांमध्ये जागृती निर्माण करावी. कृषि निविष्ठांची एकत्रित खरेदी, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादकतेमध्ये वाढ आणि मुख्यत्वे महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांचे गट स्थापन करुन, त्यांच्या शेतमालाचे एकत्रिकरण करुन, बाजाराच्या नवीन संधी मिळवून देण्याचा उद्देश या जनजागृतीतून शेतक-यांपर्यंत पोहचवावा. गटनिर्मितीमुळे वैयक्तीक शेतक-याला होणारा फायदा विशद करावा, म्हणजे शेतकरी स्वयंस्पुर्तीने गटामध्ये सामील होऊन कार्यशिल सभासद म्हणून काम करेल. या जनजागृतीसाठी प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना भेटी देऊन सरपंच आणि अन्य पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन गावात गावसभा घ्याव्यात, ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डावर गटनिर्मितीबाबत नोटीस प्रसिद्ध करावी. पोस्टर्स तयार करुन प्रसिद्धी करावी. तसेच स्थानिक दैनिक वृत्तपत्रातून प्रसिद्धी द्यावी. याशिवाय गावात दवंडी द्यावी. तसेच बॅनर्स, पोस्टर्स, जीपमधून लाऊडस्पीकर्स द्वारे गावात फिरती करुन प्रसिद्धी द्यावी. (परिशिष्ट - ७).

**४.१ नवीन गटांची स्थापना -**

निवडलेल्या एका समुहात (Cluster) किमान १५ ते २० गट असणे अपेक्षित आहे. अस्तित्वातील गट एवढया मोठया प्रमाणावर एका समुहात (Cluster) मिळू शकत नाहीत, म्हणून अस्तित्वातील गटा व्यक्तिरीक्त आवश्यक नवीन गटांची स्थापना सेवपुरवठादार संस्थांनी करावयाची आहे. यासाठी बचत गट स्थापनेच्या पद्धतीने गटांची स्थापना करावी.

**४.२** जनजागृतीनंतर गावात जाऊन स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन गट स्थापन करु ईच्छिणा-या शेतक-यांची यादी करावी. या प्रकल्पामध्ये शेतमालाचे एकत्रीकरण करणे आणि सामुहीरित्या पर्यायी बाजारात विक्री करणे हे उद्दीष्ट असल्याने या उद्दीष्टाने एकत्रीत येऊ इच्छिणा-या अल्प अत्यंत भूधारक तसेच महिला शेतकरी आणि अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती आणि इतर सामाजिक घटकातील शेतक-यांचा प्राध्यान्याने या गटामध्ये समावेश करावा व अशा रितीने गटाच्या सदस्यांची यादी अंतिम झाल्यानंतर पुढील प्रमाणे करण्यात यावी. या गटांच्या कामकाजासाठी पुढील प्रमाणे तीन सत्रामध्ये प्रशिक्षण घेण्यात यावे.

४.३ **प्रशिक्षण सत्र - १**

यादीतील १५ ते २० शेतक-यांचा वरील प्रमाणे एका गटात समावेश गटामधील सदस्यांचे पहिले प्रशिक्षण आयोजीत करुन त्यात खालील बाबी अंतिम कराव्यात. या प्रशिक्षण सत्रात गटाचे नामकरण करावे, गटाचे पदाधिकारी जसे अध्यक्ष, सचिव, खजिनदार निश्चित करावेत. या प्रशिक्षणात गटाचे फायदे काय आहेत आणि खास करुन महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पात गट स्थापनेचा उद्देश प्रथम प्रशिक्षणामध्येच स्पष्ट करावा.

**४.३.१** गटाच्या कार्यालयाची/बैठकीची जागा निश्चित करावी. गटाच्या सदस्यांपैकी स्वयंमस्पूर्तीने पुढे येणा-या एका सदस्यांच्या मालकीच्या जागेत अथवा गावात सार्वजनिक ठिकाणी जागा उपलब्ध असल्यास (वाचनालय, ग्रामपंचायत इ.) गटाचे कार्यालय आणि बैठकीसाठी जागा निश्चित करावी.

**४.३.२** कागदपत्रे जमा करणे :- हा शेतक-यांचा गट असल्याने गटात सहभागी शेतक-यांचे ७/१२ उतारे जमा करावेत. शेतकरी कुटुंबातील एखाद्या शेतक-याच्या नावावर शेती नसेल परंतू तो गटात काम करण्यासाठी उत्साही असेल तर त्या कुटुंबात ज्याच्या नावे शेती आहे त्याचा ७/१२ उतारा घ्यावा आणि कुटुंबातर्फे गटात सहभागी होणा-या सदस्यास कुटुंबाच्या वतीने प्राधीकृत केल्याचे ७/१२ ज्यांच्या नावे आहे त्यांचे पत्र घ्यावे. तथापि एका कुटुंबातून एकाच व्यक्तीला सदस्यत्व द्यावे.

**४.३.३** गटाचे लेखे ठेवण्यासाठी आवश्यक नोंदवह्यांचा संच (उदा - इतिवृत्त व ठराव नोंदवही, भेट नोंदवही, रोजकीर्द इ.) सेवापुरवठादार संस्थेने गटास द्यावा आणि या नोंदवह्यामध्ये नोंदी कशा ठेवाव्यात याबाबत गटास प्रशिक्षण द्यावे आणि गटाच्या सचिवावर ही जबाबदारी सोपवावी.

**४.३.४** गटाची ईच्छा असल्यास बचत गटाच्या धर्तीवर अंतर्गत आर्थिक देवाण-घेवाणी बाबतच्या पद्धतीबाबत गटातील शेतक-यांना माहिती द्यावी.

**४.३.५.**गटाची नोंदणी आत्मा संस्थेकडे करण्यासाठी आणि पुढे शेतकरी उत्पादक कंपनीच्या सदस्यत्वासाठी प्रति डोई आवश्यक निधी गटाच्या खजिनदाराकडे जमा करावा.

**४.३.६.**सदरच्या प्रशिक्षणासाठी शक्यतो प्रकल्प संचालक, आत्मा यांचे प्रतिनिधी म्हणून कृषि पणन तज्ञ, बी.टी.एम. एस.एम.एस. किंवा कृषि सहाय्यक यांना आमंत्रित करावे म्हणजे ते या प्रशिक्षणासाठी हजर राहतील. प्रपत्र क्रमांक ६ नुसार प्रशिक्षणाचा अहवाल सादर करावा.

**४.४ गटांची आत्मा स्तरावर नोंदणी :-**

सेवापुरवठादार संस्थांनी कागदपत्रांसह गटाची नोंदणी आत्मा संस्थेकडे करण्यासाठी अर्ज सादर करावा. नोंदणीसाठी आवश्यक रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे जमा निधीतून खर्च करावी. हे गट जागतिक बँकेच्या महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पातून स्थापन करण्यात येत असून या प्रकल्पातून आत्मा संस्थेस भरीव सहाय्य करण्यात येत आहे. ही बाब लक्षात घेवून गटांच्या नोंदणीसाठी शुल्कामध्ये आत्मा मार्फत सवलत देण्यात यावी. हा प्रकल्प एका कालबद्ध समय मर्यादेत राबवावयाचा असल्याने गटांची नोंदणी अर्ज प्राप्त झाल्यापासून एका आठवडयात करुन नोंदणी प्रमाणपत्र सेवापुरवठादार संस्थेकडे आत्माने हस्तांतरीत करावे.

**४.५ गटांचे बँकेत खाते उघडणे :-**

आत्मा संस्थेने गट नोंदणीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर अशा गटांनी बँकेमध्ये गटाच्या नावाने बँक खाते उघडावे आणि गटाची आर्थिक उलाढाल या खात्यामार्फत करावी. या खात्याचे व्यवहार गटाने ठरवलेल्या सदस्यांनी करावे. गट स्थापन करतांना खजिनदाराकडे जमा केलेली रकक्म या बॅंक खात्यात जमा करावी.

**५. गटांचे बळकटीकरण :-**

**५.१ गटांच्या प्रशिक्षणाच्या गरजा ओळखणारा अहवाल तयार करणे :-**

ज्या समान उद्देशांसाठी गट निर्मिती झालेली आहे तो उद्देश पूर्ण करण्यासाठी कोणत्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे त्याची शहनिशा करण्यासाठी विशिष्ट पद्धत वापरुन (सुरुवातीचे पायाभूत सर्व्हेक्षण व प्रारंभिक अहवाल याच्या आधारे आणि गटाचे सदस्य, विस्तार कर्मचारी/अधिकारी इ. साठी प्रश्नावली तयार करुन) वापरुन गटांच्या प्रशिक्षणाच्या गरजा ओळखणारा अहवाल तयार करावा.

**५.२ प्रशिक्षणाचे मॉडयुल आणि प्रशिक्षण साहित्य तयार करणे :-**

वर नमुद अहवालाच्या आधारे दोन प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणाचे मॉडयुल तयार करावे. यातील एक प्रशिक्षण त्या भागातील प्रमुख पिके आणि विविध विभागाच्या गटास उपयोगी पडणा-या योजना यासाठी असेल तर दुसरे प्रशिक्षण गटांना बाजाराभिमुख कृषि विस्ताराच्या आधारे बाजारांना जोडण्यासाठी असेल. या दोन्ही प्रशिक्षणासाठी आवश्यक प्रशिक्षण साहित्य (प्रशिक्षण पुस्तिका, पावर पॉईंट प्रेझेंटेशन, सीडी इ.) तयार करावे.

**५.३ प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करणे :-**

शेतकरी गटांना देण्यात येणा-या प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करुन, त्याची प्रकल्प संचालक, आत्मा यांचेकडून मान्यता घ्यावी. जिल्ह्यात साधारणतः ४०० गटांचे प्रशिक्षण (अस्तित्वात असलेल्या

आणि नव्याने स्थापन करावयाच्या) घ्यावे लागणार आहे. या प्रशिक्षणासाठी संस्थेकडे उपलब्ध मनुष्यबळ आणि उपलब्ध कालावधी याचा विचार करुन प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करावे. असे वेळापत्रक तयार करतांना एका प्रशिक्षण सत्रात साधारणतः ३ ते ५ गटांना एकत्रित प्रशिक्षण दिल्यास उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे उपलब्ध वेळेत प्रशिक्षण देणे शक्य होईल. प्रशिक्षणाचे वेळापत्रक प्रपत्र - ८ नुसार करावे.

**५.४ प्रशिक्षण सत्र - २**

वर नमुद केल्याप्रमाणे त्या भागातील प्रमुख पिके आणि विविध विभागाच्या गटास उपयोगी पडणा-या योजना यासाठी मॉडयुल व प्रशिक्षण साहित्य तयार करुन वेळापत्रका नुसार प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

**५.५ प्रशिक्षण सत्र - ३**

हे प्रशिक्षण शेतक-यांचे संघ/कंपन्या स्थापन करण्यासाठी नेमण्यात येणा-या दुस-या सेवापुरवठादारा सोबत घ्यावयाचे आहे. हे प्रशिक्षण वर नमुद केल्याप्रमाणे गटांना बाजाराभिमुख कृषि विस्ताराच्या आधारे बाजारांना जोडण्यासाठी असेल. यासाठी मॉडुयल व प्रशिक्षण साहित्य तयार करुन वेळापत्रका नुसार प्रशिक्षणाचे आयोजन करावे. प्रपत्र - ९ नुसार प्रशिक्षणाचा अहवाल सादर करावा.

**६. गटांचे मुल्यमापन व वर्गवारी –**

स्थापित शेतकरी गटांचे मुल्यमापन व वर्गवारी प्रकल्प संचालक, आत्मा, प्रकल्प उपसंचालक, आत्मा (प्रशिक्षण व पणन) व कृषि पणन तज्ञ यांनी संयुक्तपणे प्रपत्र - १० नुसार करावयाचे आहे.

**६.१** आत्मा संस्थेच्या अधिका-यांनी गटांचे मुल्यमापन खालील प्रमाणे करावे.

- गटांचे मुल्यमापन करुन त्यांचे वर्गवारी करणे (परिशिष्ट-१० शेतकरी गटांचे मुल्यांकन)
- प्रकल्प संचालक, आत्मा यांनी ०५ टक्के गटांचे मुल्यमापन स्वतः करावे.
- प्रकल्प उपसंचालक, आत्मा (प्रशिक्षण व पणन) यांनी १० टक्के गटांचे मुल्यमापन करावे.
- कृषि पणन तज्ञ यांनी उर्वरीत १५ उर्वरीत गटांचे मुल्यमापन करावे.

**६.२.** मुल्यमापनामध्ये गटाचे रेटीग ब ग्रेड पेक्षा कमी रेटींग असणा-या गटांचे सक्षमीकरण करण्यासाठी सेवापुरवठादार यांना विहीत मुदत देऊन बळकटीकरणाबाबत सुचना देऊन पुन्हा त्याचे रेटींग करावे. (परिशिष्ट ११ व १२)

**७.** वरील प्रक्रियेनुसार गट स्थापन करुन त्याची नोंदणी होऊन ए गेडच्या गटासाठी रुपये पाच हजारापर्यंतचे एक किट आत्मा संस्थेमार्फत देण्यात येईल. (त्यामध्ये अभिलेख जतन करण्यासाठी कपाट, टेबल, खर्ची, बैठकीसाठी चटई/संतरंजी व इतर किरकोळ साहित्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल).

**७.१** ज्या गटांचे रेटींग अ ग्रेड मध्ये आहे अशा १५ ते २० समान उद्देश असलेल्या गटाची कंपनी निर्मितीसाठी कार्यवाही सुरु करावी.

**७.२** रेटींग बाबत गट स्थापनेसाठी नियुक्त सेवापुरवठादार संस्था, (SP For CIG/FIG) आणि  गटांचे संघ/कंपन्या स्थापन करण्यासाठी नियुक्त सेवापुरवठादार (SP For FCSC) यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास प्रकल्प संचालक, आत्मा यांचा निर्णय घेतील आणि तो निर्णय अंतिम राहून दोघांनाही बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे शेतकरी गट निर्मिती झाल्यानंतर त्यांचे शेतकरी उत्पादन कंपनी मध्ये रुपांतर करण्यासाठी सेवापुरवठादार यांच्या समवेत कार्यवाही करावी.

शेतकरी कंपनी स्थापनेसाठीच्या सूचना स्वतंत्रपणे निर्गमीत करण्यात येत आहेत.

प्रपत्र - १

## जिल्हानिहाय गट निर्मीतीसाठी नियुक्त सेवा पुरवठादार संस्था

| अ.क्रं. | जिल्हा | निवडण्यांत आलेली संस्था | गटनिर्मिती लक्ष्य | | गटनिर्मिती साध्य | | संस्थेबाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पिक | पशुसंवर्धन | पिक | पशुसंवर्धन | |
| १ | नागपूर | इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीबिझनेस प्रोफेशनल, न्यु दिल्ली | ४०० | ४० | | | |
| २ | वर्धा | | ४०० | ० | | | |
| ३ | भंडारा | | ३५० | ४० | | | |
| ४ | गोंदिया | | ३०० | ४० | | | |
| ५ | चंद्रपूर | | ३ | ० | | | |
| ६ | गडचिरोली | | ३०० | ० | | | |
| ७ | नांदेड | दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद | ४०० | ० | | | |
| ८ | बीड | | ४०० | ० | | | |
| ९ | लातूर | | ३५० | ० | | | |
| १० | उस्मानाबाद | | ३५० | ० | | | |
| ११ | सोलापूर | | ४०० | १२० | | | |
| १२ | सिंधुदुर्ग | इंटर को-ऑपरेशन, सिकंदराबाद | ३५० | ० | | | |
| १३ | रत्नागिरी | | ३५० | ० | | | |
| १४ | रायगड | | ३५० | ० | | | |
| १५ | ठाणे | | ४४० | ० | | | |
| १६ | नाशिक | महाराष्ट्र इन्स्टीटयुट ऑफ टेक्नोलॉजी ट्रान्सफर, नाशिक | ४०० | ४० | | | |
| १७ | धुळे | | ३५० | ४० | | | |
| १८ | नंदुरबार | | ३५० | ० | | | |
| १९ | जळगाव | | ४०० | ८० | | | |
| २० | पुणे | ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चर रिनिवल इन महाराष्ट्र, पुणे | ४०० | ८० | | | |
| २१ | सातारा | | ४०० | ४० | | | |
| २२ | सांगली | | ४०० | ० | | | |
| २३ | कोल्हापूर | | ४०० | ४० | | | |
| | एकुण | | ८२४३ | ५६० | | | |

**प्रपत्र - २**

**गट निर्मितीसाठी निवडलेल्या सेवा पुरवठादार संस्थेचा माहिती अहवाल**

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नावं | जिल्हयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी नाव | पदनाम | फोन | ईमेल आयडी | बँक अंकौट नंबर व बँकेचे नाव | संस्थेत कधीपासून काम करतात | स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

टिप :- आत्मा कार्यालय येथे घेण्यात येणा-या सेवापुरवठादार यांच्या मासिक आढावा बैठकीत वरील प्रपत्रामध्ये माहिती घेऊन, आढावा बैठकीनंतर प्रकल्प संचालक, आत्मा यांचे स्वाक्षरीने अहवाल या कार्यालयास पाठवावे.

# प्रपत्र - ३

# Annexure - 3
## Village wise Crop Details of Taluka

| Name of the Taluka: ________________________________________________ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of the Village | Name of the Crop | Area under Cultivation (Ha) | Productivity (q/ha) | Total Production (q) |
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |

Note
1. This information is to be colleted from a) Talathi & b) Agriculture Assistant
2. Collected information has to be entered in the annexure - 1
3. Villages, then, can be clustered by using information on total production of annuxure - 1

# प्रपत्र - ४

# Annexure - 4

## Crop wise Marketable Surplus (Sample Survey )

**Name of Taluka :-**

| **Name of the Crop: ____________________** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| **Sr. No.** | **Name of the Village** | **Name of the Farmer** | **Area under Cultivation (Ha)** | **Productivity (q/ha)** | **Total Production (q)** | **Quantum of Total Prouction Sold (q)** | **% of Marketable Surplus {(7)/(6)}** |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |
| 6 | | | | | | | |
| 7 | | | | | | | |
| 8 | | | | | | | |
| 9 | | | | | | | |
| 10 | | | | | | | |

Note

1. This information in annexure - 2 has to be collected by interviewing 50 small & Marginal farmers from 10-20 Villages. Care should be taken to interview not more than 3 farmers per village.
2. Farmers who are to be interviewed should be i) marginal ii) small categories of farmers.

# प्रपत्र - ५

# Annexure - 5

# Crop wise Potential Cluster

**Pontetial Cluster :-**

**Names of villages :** ____________________________________________

| Sr. No. | Crop | Total Production | % of Marketable Surplus | Total Marketable Surplus |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| Total | | | | |

**Pontetial Cluster :-**

**Names of villages :** ____________________________________________

| Sr. No. | Crop | Total Production | % of Marketable Surplus | Total Marketable Surplus |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| Total | | | | |

**Pontetial Cluster :-**

**Names of villages :** ____________________________________________

| Sr. No. | Crop | Total Production | % of Marketable Surplus | Total Marketable Surplus |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| Total | | | | |

## Annexure - 6
## Map of Taluka with village boundaries demarketing identified cluster

**(Not to scale)**

**प्रपत्र - ७**

**गट स्थापनेसाठीचा जनजागृती अभियान अहवाल**

| अ.क्र. | गांव | गाव सभेचा दिनांक | जनजागृतीसाठी कोणती पध्दत वापरली | सभेसाठी उपस्थित संस्थेचे कर्मचारी | उपस्थित कृषि व संलग्न विभागाचे अधिकारी | उपस्थित मार्गदर्शक तज्ज्ञ | उपस्थित शेतकरी संख्या | जनजागृतीसाठी कोणते साहित्य देण्यांत आले. | जनजागृती मध्ये कोणत्या विषयावर चर्चा झाली | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

प्रपत्र - ८

१. TNA साठी तयार केलेले पत्र आणि या प्रपत्रात ज्या शेतक-यांकडून व अन्य क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचारी कडून माहिती घेतली ते सर्व भरलेल्या प्रपत्राची प्रत
२. उपरोक्त TNA वर आधारीत तयार करण्यात आलेले प्रशिक्षण क्र. १ व २ चे मोड्युल
३. उपरोक्त प्रशिक्षण मॉड्युल नुसार प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी तयार करण्यात आलेली प्रशिक्षण पुस्तीका.
४. नियोजीत प्रशिक्षण वेळापत्रक.

| अ.क्र | दिनांक | गाव | गटांचे नाव | प्रशिक्षणाचे स्थळ | प्रशिक्षण देणा-या तज्ञाचे नाव | कृषि विभागाचे उपस्थित अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

प्रपत्र - ९

# शेतकरी गट स्थापनेसाठी सेवापुरवठादार संस्थेचा अहवाल

१) शेतकरी गट स्थापन केलेल्या गटांचे प्रशिक्षण क्र. १ आणि क्र. २ (स्वतंत्र अहवाल)

| अ.क्र | गाव | गटाचे नाव | प्रशिक्षणाचा दिनांक | प्रशिक्षणासाठी | | उपस्थित शेतकरी संख्या | उपस्थित कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | उपस्थित कृषि विभागाच्याअधिकारी / कर्मचा-यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विषय | तज्ञ | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

# प्रपत्र - १०

# शेतकरी गटांचे मुल्यांकन

## अ) शेतकरी गटांची प्राथमिक माहिती.

| | | |
|---|---|---|
| १) | शेतकरी गटांचे नाव | |
| | गाव - | मंडळ - |
| | तालुका- | जिल्हा - |
| २) | गट स्थापनेचा दिनांक | आत्मा / नाबार्ड / धर्मादाय आयुक्त/ इतर |
| ३) | गट नोंदणी | |
| ४) | गट नोंदणी क्रमांक | |
| ५) | सदस्य संख्या | पुरुष :- महिला:- |
| ६) | गटाच्या सभेची वारंवारता | पंधरवाडा / महिना |
| ७) | गटातील शेतक-यांची प्रमुख पिके | |
| ८) | गट स्थापनेचा प्रमुख उध्देश | |
| ९) | गटाचे प्रमुख पदाधिकारी | |
| | अ) अध्यक्ष<br>ब) सचिव<br>क) खजिनदार | |
| १०) | गटाचे बँक / खाते क्रमांक<br>बँकेचे नाव व शाखा | |
| ११) | गटाची बचत प्रति सदस्य / प्रति महिना | |
| १२) | गटाची बचत एकुण बचत रक्कम रुपये | |
| १३) | उत्पादक कंपनीचे सदस्यत्व असल्यास<br>कंपनीचे नाव व नोंदणी क्रमांक | |
| १४) | शेती आधारीत प्रक्रीया उद्योग असल्यास<br>त्यांचा तपशिल | |
| १५) | गट कोणी स्थापन केला | |

ब) शेतकरी गट / समुह गुणवत्ता मापण

गटाचे नाव - गाव - तालुका- जिल्हा-

| अ. क्र. | बाब | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|
| १) | गटांमधील समन्वय/ ऐक्य / आत्मीयता / एकसंघता<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००) | १० | |
| २) | गटातील सदस्यांना गट स्थापनेचे उद्दीष्ट, नियमावाली, जबाबदारी व बचत इ. बद्दल माहिती<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००) | १० | |
| ३) | गटाची सभा<br>अ) सभा नियमित वेळी व तारखेला > ९०% — गुण-१०<br>ब) ७१ ते९०% — गुण-०८<br>क) ५०ते ७०% — गुण-०५<br>ड) < ५० — गुण-०० | १० | |
| ४) | सभेसाठी सदस्यांची उपस्थिती<br>अ) सरासरी उपस्थिती > ९०% — गुण- १०<br>ब) सरासरी उपस्थिती ७१ ते ९०% — गुण-०८<br>क) सरासरी उपस्थिती ५० ते ७०% — गुण-०५<br>ड) सरासरी उपस्थिती < ५०% — गुण-०० | १० | |
| ५) | गटाचे रेकॉर्ड व्यवस्थापन<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००)<br>अ) इतिवृत्त वही<br>ब) सर्वसाधरण नियमावली व कायदे इ.बाबत ठराव<br>क) सभा उपस्थिती नोंदवही<br>ड) कृषि आधारीत उपक्रमाची नोंदवही<br>ई) शेती कृषि निवष्ठा खरेदी नोंदवही<br>फ) कृषि उत्पादन व इतर नोंदवही | १० | |
| ६) | कृषि विषयक व्यवसाय कार्यक्रमाची माहिती<br>अ)९०% पेक्षा जास्त सभासदांनार माहिती — गुण- ०५<br>ब) ७१ ते ९०% सभासदांना महिती — गुण-०४<br>क) ५० ते ७०% सभासदांना महिती — गुण-०३<br>ड) ५०% पेक्षा कमी सभासदांना महिती — गुण-०० | ०५ | |

क) शेतकरी गट/ समुह गुणवत्ता (वित्तीय बाबींवर आधारीत)

| अ. क्र. | बाब | | | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| १) | गटाची बचत | | | ०५ | |
| | अ) | सर्व सदस्यांची नियमित बचत | गुण-०५ | | |
| | ब) | ९९% ते ९० % सदस्यांची नियमित बचत | गुण-०४ | | |
| | क) | ७० ते ९० % सदस्यांची नियमित बचत | गुण-०३ | | |
| | ड) | ७०% सदस्यांची नियमित बचत | गुण-०० | | |
| २) | गटांतर्गत कर्ज पध्दती | | | ०५ | |
| | अ) | ९० % पेक्षा जास्त शेतक-यांना कर्ज वाटप | गुण-०५ | | |
| | ब) | ७१ ते ९० % पेक्षा जास्त शेतक-यांना कर्ज वाटप | गुण-०४ | | |
| | क) | ५० ते ७० % पेक्षा जास्त शेतक-यांना कर्ज वाटप | गुण-०३ | | |
| | ड) | ५० % पेक्षा कमी शेतक-यांना कर्ज वाटप | गुण-०० | | |
| ३) | गटांतर्गत कर्जाची परतफेड (मागील वर्षातील) | | | ०५ | |
| | अ) | १०० टक्के मुद्दल व व्याजसहित परतफेड | गुण-०५ | | |
| | ब) | ७० ते ९० % मुद्दल व व्याजसहित परतफेड | गुण-०४ | | |
| | क) | ५० ते ७० % मुद्दल व व्याजसहित परतफेड | गुण-०३ | | |
| | ड) | कर्ज परतफेड नाही. | गुण-०० | | |
| ४) | गटांतर्गत सदस्यांची गुणवत्ता | | | ०५ | |
| | अ) | थकबाकीदार नाही | गुण-०५ | | |
| | ब) | १ ते २ थकबाकीदार | गुण-०४ | | |
| | क) | २ ते ४ थकबाकीदार | गुण-०३ | | |
| | ड) | ५ पेक्षा जास्त थकाबाकीदार | गुण-०० | | |
| ५) | गटाचे लेखा अभिलेख<br>(उत्कृष्ट-५, चांगले-४, सर्वसाधारण-३) | | | ०५ | |
| | अ) | बचतीचे नियमित नोंद होणारे लेजर वही अद्यावत | गुण-०५ | | |
| | ब) | कर्जाची नोंदवही | गुण-०४ | | |
| | क) | कॅशबुक अद्यावत | गुण-०३ | | |
| ६) | कृषि आधारीत प्रक्रिया / उपक्रमाची वार्षिक उलाढाल | | | १० | |
| | | ५ लाख पेक्षा जास्त | गुण - १० | | |
| | | ५ लाख ते १ लाख पेक्षा जास्त | गुण - ०७ | | |
| | | १ लाख ते ५० हजार | गुण - ०५ | | |
| | | ५० हजार ते २५ हजार | गुण - ०३ | | |
| | | शुन्य उलाढाल | गुण - ०० | | |

| अ. क्र. | बाब | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|
| ७) | कृषि व संलग्न विभागाच्या उपक्रमात गटांचा सहभाग<br>अ) उपक्रमाचे नाव<br>ब) कालावधी<br>क) स्वरुप<br>ड) गटाचे सहाय्य | ०५ | |
| ८) | गटांचे उत्पादक कंपनीमध्ये सदस्यत्व<br>कंपनीचे नाव :<br>स्थापन वर्ष : | ०५ | |

| **अ.क्र.** | **मार्क** | **श्रेणी** |
|---|---|---|
| १ | १०० ते ७५ च्या दरम्यान | अ |
| २ | ७४ ते ६० च्या दरम्यान | ब |
| ३ | ५९ ते ४० च्या दरम्यान | क |
| ४ | ३९ पेक्षा कमी | ड |

## प्रपत्र - ११

## शेतकरी गट मुल्यांकन अहवाल

कार्यालय :- प्रकल्प संचालक, आत्मा, सेवा पुरवठादार संस्थेचे नांव :

| अ.क्र. | एकुण गट (लक्षांक) | मुल्यांकन किती गटांचे झाले | उर्ववरित गटांचे मुल्यांकन किती तारखे पर्यंत पुर्ण होणार | मुल्यांकन झालेल्या गटा बाबत माहिती | | | | मुल्यांकनाच्या दिनांकास हजर राहून प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी लक्षांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | कृषि पणन तज्ञ (१५%) | | प्रकल्प उपसंचालक, आत्मा २ (१०%) | | प्रकल्प संचालक, आत्मा (५%) | |
| | | | | (संख्या) | (संख्या) | (संख्या) | (संख्या) | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

कृषि पणन तज्ञ
जिल्हा :

प्रकल्प उपसंचालक, आत्मा २
जिल्हा :

प्रकल्प संचालक, आत्मा
जिल्हा :

# प्रपत्र - १२

शेतकरी गट मुल्यांकन अहवाल

कार्यालय :- प्रकल्प संचालक, आत्मा -

सेवा पुरवठादार संस्थेचे नांव :

| अ.क्र. | "अ" व्यतिरिक्त गटासाठी प्रशिक्षण कधी घेणार | पुर्नमुल्यांकन कधी करणार? |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

कृषि पणन तज्ञ

जिल्हा :

प्रकल्प उपसंचालक, आत्मा २

जिल्हा :

प्रकल्प संचालक, आत्मा

जिल्हा :